क्र.शिउसं/मा-४/नमाशाप/२००४-०५/ 17689-92
शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग
यांचे कार्यालय, जवाहर बालभवन,
चर्नीरोड, मुंबई ४०० ००४
दिनांक - १३ जुलै, २००४

प्रति,

सचिव,
धर्मसंस्थेशीठी शाम ज्ञ मालेचट
मुंबई

विषय : २००३-२००४ व २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात शासनाचे आदेशानुसार नवीन माध्यमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन-२१०३/(५०/०३)/माशि-२, दिनांक २७ मे २००३

२) शासन पत्र, शालेय शिक्षण विभाग, क्र. नमाशा-१००४/(३७८/०४) माशि-१, दिनांक ५ जुलै २००४

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन, आपल्या संस्थेस सन २००३-२००४ / ~~२००४-२००५~~ या शैक्षणिक वर्षापासून मराठी या माध्यमातून इयत्ता ८ वी करीता मालाड मुंबई येथे कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाचे संदर्भिय क्रमांक २ मध्ये उल्लेखित दिनांक ५ जुले २००४ च्या पत्रातील सूचनेनुसार माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम १९८१ नुसार तसेच, खालील सर्व अटींची पूर्तता विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या शर्तीवर नवीन कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे.

माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच, खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच सदरची परवानगी व त्याबाबतची कार्यवाही शासन आदेशानुसार करण्यात येत आहे.

१. कायम विनाअनुदान तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे संस्थेच्या अध्यक्षांनी शपथपत्र सादर करणे बंधनकारक आहे. हे पत्र मिळाल्यापासून ३ दिवसात संबंधित शिक्षण अधिकारी / निरीक्षक कार्यालयास सादर करावे व त्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.
२. आपल्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा विद्यार्थ्यांच्या फीच्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही असा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र हे पत्र मिळाल्यापासून या कार्यालयाकडे तीन दिवसात सादर करणे आवश्यक आहे. सदर पत्राची प्रत संबंधित शिक्षण निरीक्षक/ शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.
३. संबंधीत संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असल्याची प्रमाणित प्रत या कार्यालयास तसेच, संबंधीत शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.
४. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही याबाबत संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे हमीपत्र या कार्यालयास व त्याची प्रत संबंधीत शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.
५. या नवीन माध्यमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर मंजुरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
६. सदर माध्यमिक शाळेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ तसेच, विनियम अधिनियम १९७७ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
७. शासन निर्णय दि. २७ मे २००३ मधील अटी व शर्तीची कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहील.
८. "कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी मिळालेली माध्यमिक शाळा" असा फलक ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने शाळेत लावणे संबंधित संस्थेवर बंधनकारक राहील.

९. सदर कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिकाऱ्यांशी / शासनास पत्रव्यवहार करतांना कायम विनाअनुदानित शाळा अशा प्रकारचे लेटर हेड वापरणे आवश्यक आहे.

१०. सदर कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळांनी शासनाच्या / व त्यांच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे ( उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत व अन्य ) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

११. संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

१२. मुख्याध्यापकाच्या नियुक्तीस संबंधित शिक्षण निरीक्षक / शिक्षणाधिकारी यांच्याकडून मान्यता घेणे बंधनकारक राहील. शिक्षक वर्ग हा मान्यताप्राप्त विद्यापिठाचा प्रशिक्षित पदवीधर असणे आवश्यक आहे.

१३. शासनाच्या वरील आदेशानुसार संस्था / शाळा जे नवीन वर्ग उघडणार आहे त्या वर्गात मुख्याध्यापकांनी न्यायालयीन आदेश व शासन मार्गदर्शनानुसार प्रवेश द्यावेत. प्रवेशाच्या वेळी कोणत्याही प्रकारच्या देणग्या स्विकारु नयेत.

१४. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७ महाराष्ट्र कायदा ६/८८ दिनांक १५-४-८८ अन्वये संस्था प्रवेशाच्या वेळी अथवा तद्नंतरच्या काळात कोणतीही देणगी गोळा करणार नाही किंवा तशी सक्ती विद्यार्थी / पालक / कर्मचारी यांच्यावर करणार नाही, याची नोंद घ्यावी.

१५. माध्यमिक शाळा संहितेतील तरतूदींचे तसेच महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे पालन करील.

१६. शाळेत मंजूर पदानुसार शिक्षक / शिक्षकेतर वर्ग यांची नेमणूक करावी. सदर नेमणूका करताना मागासवर्गीयासाठी ठरविण्यात आलेल्या प्रमाणाचे काटेकोरपणे पालन करावे.

१७. कर्मचारी संच संबंधित शिक्षण निरीक्षक/शिक्षणाधिकारी यांचेकडून मंजूर करुन घ्यावा.

१८. विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची ॲक्टिव्हिटी फी आकारु नये.

१९. शाळेचे हिशेब व सर्व प्रकारच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.

२०. शाळेतील विद्यार्थ्यांना पोषक वातावरण, योग्य इमारत, सुसज्ज ग्रंथालय/प्रयोगशाळा, स्वतंत्र शिक्षक कक्ष असणे आवश्यक आहे.

२१. शिक्षक- पालक संघटनेची स्थापना करणे आवश्यक आहे.

२२. मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह असणे आवश्यक आहे.

२३. संस्थेच्या अध्यक्षांकडून कायम विनाअनुदानित तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२४. शासनाच्या पूर्वपरवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

वरील अटींनुसार योग्य ती कार्यवाही करावी, तसेच, वरील बाबींचा (क्र. १ ते ४ क्षमीपत्र) खुलासा हे पत्र मिळाल्यापासून ३ दिवसाचे आत खास दूतांकरवी या कार्यालयास व संबंधित शिक्षण निरीक्षक / शिक्षणाधिकारी यांचेकडे सादर करावा. नवीन माध्यमिक शाळा केव्हापासून सुरु करण्यात येत आहे ती तारीखही कळविण्यात यावी. त्याचप्रमाणे वरील सर्व अटी मान्य असल्याबाबतचे लेखी पत्र तीन दिवसात या कार्यालयास व संबंधित शिक्षण निरीक्षक/ शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयास कळविणे बंधनकारक राहील.

शिक्षण उपसंचालक,
मुंबई विभाग, मुंबई

प्रत माहितीसाठी सविनय सादर :

मा. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत - शिक्षण निरीक्षक, उत्तर/दक्षिण/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई

प्रत - शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, ठाणे /रायगड

यांना कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या सर्व बाबींची संस्था पूर्तता करते किंवा कसे याची तपासणी करुन अहवाल या कार्यालयास ३० दिवसात सादर करावा. तदनंतर १५ दिवसानंतर प्रथम मान्यतेसाठी अहवाल सादर करावा.